ePaper
“धनंजय मुंडे यांच्या वाट्याला आयुष्यभर संघर्ष: उपमुख्यमंत्री अजित पवार



| वर्ष - 7 | अंक - 116 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार , दिनांक 28 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- कात्रज चौकातील वाहतूक कोंडी जैसे थे!
- धर्मेंद्रला पाहून हेमा मालिनी खूश
- जिल्ह्यातील शिवभोजन केंद्रांना टाळे!

# पिंपरी-चिंचवडमध्ये साकारणार ‘राष्ट्रवादी भवन’!

## » अजित पवार गटाकडून जागेची निश्चिती : राज्यातील ‘रोल मॉडेल’ कार्यालय बनवण्याचा संकल्प

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या गटाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य ‘राष्ट्रवादी भवन’ उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पिंपळे निलख- वाकड बीआरटी मार्गालगत जागेची निश्चिती केली असून, लवकरच कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.**



विशेष म्हणजे, राज्यातील २८८ आमदार आणि ४८ लोकनियुक्त खासदार तसेच, विधान परिषद आमदार, राज्यसभा खासदारांसाठी ‘रोल मॉडेल’ मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय साकारण्यात येणार असून, याकामी स्वत: अजित पवार यांनी लक्ष घातले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे २० वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता राहिली आहे. त्या काळात शहरातील सर्व कारभार अजित पवार यांच्या हाती एकवटला होता. त्यामुळे शहरात पक्षाचे प्रशस्त कार्यालय उभारावे, अशी इच्छा अजितदादा यांची होती. मात्र, २०१७ मध्ये महापालिकेतील सत्तेतून पक्षाला पायउतार व्हावे लागले. त्यामुळे ‘राष्ट्रवादी भवन’ ही संकल्पना मागे पडली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या फुटीनंतर पक्ष कार्यालयाबाबत ठिकठिकाणी वाद सुरू झाल्याचे दिसते. पिंपरी-चिंचवड शहरातही दोन गट निर्माण झाल्याने सध्याचे पक्ष कार्यालय कोणाचे? असा प्रश्न उपस्थित राहिला होता. मात्र, या चर्चेच न पडता उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने स्वतंत्र कार्यालय उभारण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार चिंचवड विधानसभा मतदार संघातील आणि मुंबई आणि पुण्याहून शहरात दाखल होण्यासाठी सोईचे या निकषानुसार पिंपळे निलख-वाकड येथे बीआरटी मार्गालगत कार्यालय उभारण्यासाठी जागा घेतली आहे, याला शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दुजोरा दिला आहे.



“ पिंपरी-चिंचवड शहराचे शिल्पकार म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ओळख आहे. या शहराला विकासाचे रोल मॉडेल म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाते. त्यामुळे या शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे भव्य ‘राष्ट्रवादी भवन’ असावे, अशी इच्छा अजितदादांनी अनेकदा बोलून दाखवली होती. याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून जागेचा शोध सुरु होता. मात्र, आता जागा उपलब्ध झाली असून, हस्तांतरण प्रक्रिया सुरु आहे. लवकरच भवनाच्या कामाला सुरूवात होईल. माझ्या शहराध्यक्षपदाच्या काळात राष्ट्रवादी भवन साकारतेय, याचा विशेष आनंद आहे.

**- अजित गव्हाणे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.**

### असे असेल राष्ट्रवादी भवन

» राष्ट्रवादी भवन किमान तीन मजली इमारत असेल. त्यामध्ये शहराध्यक्ष, युवकाध्यक्ष, महिला अध्यक्ष यांच्यासाठी स्वतंत्र केबीन, राज्यातील नेत्यांसाठी अँटीचेंबर, कान्फरन्स हॉल, छोटे सभागृह, पाहुण्यांसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था, पार्किंग, ग्रंथालय, कन्टीन अशी सुविधा देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या धर्तीवर हे राष्ट्रवादी भवन उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

# गुणवत्तेसाठी शिक्षण पध्दतीत बदल हवा!

## » डॉ. दीपक फाटक : पीसीसीओई मध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**भारतीयांमध्ये तरुणांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. या गुणवत्तेचा योग्य वापर करायचा असेल तर आपल्या शिक्षण पध्दतीत बदल आवश्यक आहे. केवळ साचेबद्ध अभ्यासक्रमांना महत्त्व न देता, व्यवसायिक, कृतिशील अभ्यासक्रमांची आखणी केली पाहिजे. तरच या बौध्दिक, कृतिशील ज्ञान संपदेचा उपयोग देशाच्या वेगवान विकासासाठी होईल, असे परखड मत आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. दीपक फाटक यांनी व्यक्त केले.**



पीसीईटीच्या पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयात सातवी 'आयसीसीयुबीई - २३' आणि दुसरी 'आयमेस - २३' या अभियांत्रिकी क्षेत्राशी संबंधित दोन आंतरराष्ट्रीय परिषदांच्या समारोप प्रसंगी डॉ. फाटक बोलत होते. यावेळी कॅपजेमिनीचे कार्यकारी उपाध्यक्ष प्रसाद शेट्ये, हेन्कल अढेसिव्हचे निलेश आडकर, आयईईई पुणेचे मंदार खुरजेकर, डॉ. अभिजित खूरपे, पीसीसीओई चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, विविध विद्या शाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विविध महाविद्यालय, कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. फाटक म्हणाले, कम्प्युटर, मेकॅनिकल, सिव्हिल, आयटी अभियांत्रिकीची अशी विभागणी आहे. गुणवत्ता पूर्ण अभियंते तयार करण्यासाठी अभियांत्रिकी अभ्यासक्रमात या सर्व विषयांचा एकत्रित समावेश केला तर उत्तम, उच्च दर्जाचे अभियंते घडतील. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विषय नीट समजून घ्या. आयुष्यभर विद्यार्थी म्हणूनच कार्यरत राहून ज्ञानसंचय जमा करा.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त आणि पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदांचे आयोजन करण्यात आले होते.

सूत्रसंचालन प्रा. अंजली श्रीवास्तव, प्रा. प्रफुल शिनकर यांनी केले. डॉ. अजय गायकवाड यांनी आभार मानले.

### नाविन्यपूर्ण संशोधनाची गरज...

» जगाला पुढे घेऊन जाण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधन गरजेचे आहे. पीसीसीओई ने आयोजित केलेली संशोधन परिषद कौतुकास्पद आहे. शैक्षणिक आणि औद्योगिक संस्थांनी एकत्रितपणे संशोधन करणे गरजेचे आहे, असे प्रसाद शेट्ये यांनी सांगितले. निलेश आडकर, मंदार खुरजेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. राजेश फुरसुले, डॉ. संजय माटेकर यांनी परिषदेचा आढावा घेतला. तसेच पुढील वर्षी होणाऱ्या 'आयसीसीयुबीई - २४' आणि 'आयमेस- २४' परिषदेची सूत्र मावळते संयोजक डॉ. किशोर किनगे, डॉ. अजय गायकवाड यांच्याकडून डॉ. रोशनी राऊत, डॉ. प्रवीण काळे यांनी स्वीकारली. तत्पूर्वीच्या सत्रात आयआयटी मुंबईच्या डॉ. मायरम शोजेल यांच्यासह अनेक प्रतिनिधींनी चर्चा सत्रात सहभाग घेतला.

# कात्रज चौकातील वाहतूक कोंडी जैसे थे!

## दीड वर्षात फक्त खांबच उभे, पूल वेळेत होणार का?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एनडीए चौकातील (चांदणी चौक) उड्डाणपूल प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन तो पूल आता दिमाखात उभा असताना, राष्ट्रीय महामार्गाचाच एक भाग असलेल्या कात्रज चौक (वंडरसिटी) ते राजस सोसायटीदरम्यानचा उड्डाणपूल मात्र अद्याप समस्यांच्या विळख्यात आहे. या उड्डाणपुलाचे काम गेले सहा महिने ठप्प आहे. मार्च २०२३मध्ये या कामाचे आठ ते दहा खांब सार्वजनिक बांधकाम विभागाने उभे केले.**

गेल्या सहा महिन्यांत केवळ दोन खांबांची भर पडली आहे. उड्डाणपुलाच्या कामाची मुदत फेब्रुवारी २०२४मध्ये संपुष्टात येणार असून, कामाचा आजवरचा वेग पाहता तो पुढील सहा महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता कमीच आहे. कात्रज चौकातील वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी 'राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा'कडून वंडरसिटी ते कात्रज-कोंढवा रस्त्यावरील राजस सोसायटी चौकापर्यंत उड्डाणपूल उभारण्यात येत आहे.

या कामाचे भूमिपजून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २४ सप्टेंबर २०२१ रोजी झाले होते. प्रत्यक्षात फेब्रुवारी २०२२मध्ये कार्यादेश देण्यात आले. उड्डाणपुलाच्या कामासाठी दोन वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. आता दीड वर्षे उलटली, तरी केवळ खांबांचीच उभारणी झाली आहे. उड्डाणपुलासाठी आवश्यक स्पॅनची निर्मिती करण्यात येत असली, तरीही ते जोडणीच्या दृष्टीने हालचाल सुरू नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मुदतीत काम पूर्ण होणार का, असा प्रश्न आहे.



### पुलाची एक मार्गिका बंदच

» कात्रज तलाव भरल्यानंतर पाणी वाहून जाण्यासाठी राजस सोसायटी चौकाजवळ नैसर्गिक प्रवाह आहे. तेथे कल्व्हर्टचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला कात्रज बसथांबा ते राजस सोसायटी या दरम्यानच्या पुलाची एक मार्गिका काही महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे कात्रजकडे जाणारी वाहतूक उड्डाणपुलाखाली अरुंद रस्त्यावरून सुरू असून, तेथे सिग्नल लागल्यानंतर वाहनांच्या रांगा लागतात.

### कामाला गती नाहीच

» भविष्यातील गरज ओळखून नितीन गडकरी यांनी कात्रज-कोंढवा रस्त्यावर दुमजली उड्डाणपूल उभारण्याची सूचना केली होती. त्यानुसार सर्व्हे करण्यासाठी काही कालावधी गेला. त्यानंतर साधारण उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. मार्गाच्या रुंदीकरणासाठी भूसंपादन प्रक्रियेला लागलेल्या विलंबामुळे कामाची गती मंदावली. त्यानंतरही कामाने गती पकडली नाही.

### उड्डाणपूल महत्त्वाचा का?

» उड्डाणपुलामुळे देहूरोड बाह्यवळण रस्त्याने सोलापूरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोंढव्याकडे जाणे सोयीचे होणार.

» कात्रज चौकातील वर्दळ प्रत्यक्षात कमी होणार असल्याने पीएमपी भाजी मंडई येथे लागणाऱ्या वाहनांच्या रांगा कमी होण्यात मदत.

» पीएमपी थांब्यावर बस आणि प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागणार नाही.

---

# जिल्ह्यातील शिवभोजन केंद्रांना टाळे!

## ‘शिवभोजन’ थाळीला घरघर लागल्याचे चित्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**करोनाकाळात व्यवसाय बंद पडल्यानंतर हातावर पोट असणाऱ्यांची आणि कामगार वर्गाची पोटाची खळगी भरणाऱ्या ‘शिवभोजन’ थाळीला घरघर लागल्याचे चित्र आहे. पुणे जिल्ह्यातील ८६ पैकी ६५ ‘शिवभोजन केंद्रां’ना विविध कारणांनी टाळे लागल्याचे समोर आले आहे. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने या उपक्रमाची सुरुवात केली होती.**



### केंद्रे बंद होण्याची कारणे काय?

- **पार्सल सुविधा सुरू असल्याचे सीसीटीव्ही फुटेज न मिळाल्याने १३ केंद्रांना टाळे.**
- **३७ केंद्रे चालकांनी स्वतःच बंद केली.**
- **जागेचे स्थलांतर करताना विनापरवानगी १३ केंद्रे बंद.**
- **सरकारकडून एक केंद्र बंद.**
- **केंद्रचालकांचा मृत्यू झाल्याने एक केंद्र बंद.**

**86**
» मंजूर केंद्रे

**21**
» सुरू असलेली केंद्रे

**65**
» बंद असलेली केंद्रे

करोनाकाळात व्यवसाय, उद्योगधंदे बंद पडले. रोजीरोटी हिरावल्याने एका मोठ्या वर्गाची गैरसोय झाली. त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारने १० रुपयांत शिवभोजन थाळीची योजना प्रत्यक्षात आणली. योजनेला राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला.

शहरातील शिवभोजन केंद्र चालकांना प्रतिथाळी ३५ रुपये आणि ग्रामीण केंद्रांना प्रतिथाळी ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पुणे जिल्ह्यात ८६ केंद्रे सुरू करण्यात आली.

‘शिवभोजन थाळी केंद्रा’त दररोज साधारणतः १०० ते १५० थाळी देण्याची अट घालण्यात आली होती. मात्र, अनेक चालकांनी निर्धारित मर्यादिपेक्षा अधिक थाळ्यांची विक्री झाल्याचे दाखवून सरकारकडून जादा अनुदान लाटण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. शिवभोजन थाळी केंद्रांना सर्वसामान्यांसह नोकरदार वर्गानीही पसंती दिली होती. त्यामुळे सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाल्याने अनेक चालकांनी गैरफायदा घेतल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

> जिल्ह्यातील एकूण ८६ शिवभोजन केंद्रांपैकी ६५ केंद्रे बंद झाली आहेत. केंद्रे बंद पडण्याची विविध कारणे आहेत. काही केंद्रांनी गरज संपल्याने बंद करण्याचा निर्णय घेतला असून, काही केंद्रांचे स्थलांतर झाल्याने बंद पडली आहेत.
>
> **- डॉ. सीमा होळकर, जिल्हा पुरवठा अधिकारी**

---

# पुण्यात बनावट सहीद्वारे कोट्यवधीची फसवणूक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मिळकतीची कागदपत्रे आणि बनावट स्वाक्षरीद्वारे एका खासगी बँकेची तीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी लष्कर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण हरेश मिस्त्री (वय ५४, रा. मुकुंदनगर) यांच्या फिर्यादीवरून राजेंद्रप्रसाद जैन, उषा राजेंद्रप्रसाद जैन, शीतलप्रसाद, विशाखा राहुल जैन, राहुल जैन, प्रेमचंद्र बोरा, नीरज जैन, मनीत जैन, अर्चना दामके यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कागदपत्रांची शहानिशा न करता कर्ज मंजूर केल्याप्रकरणी दोन बँकेतील अधिकाऱ्यांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, 'राजेंद्रप्रसाद जैन, उषा जैन, शीतलप्रसाद, विशाल जैन यांनी फिर्यादी किरण मिस्त्री यांची बनावट स्वाक्षरी, तसेच कागदपत्रांचा वापर करून द धरमपेठ मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीच्या नवी पेठ शाखेतून तीन कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. कर्जप्रकरणात राहुल जैन, प्रेमचंद बोरा, नीरज जैन यांनी जामीनदार म्हणून स्वाक्षरी केली होती.

द धरमपेठ मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीच्या कर्ज वितरण अधिकारी अर्चना दामके यांनी कागदपत्रांची पडताळणी न करता कर्ज मंजूर केले होते. फिर्यादी किरण मिस्त्री आणि त्यांच्या पतीचे कॅम्प परिसरात कार्यालय आहे. हे कार्यालय राजेंद्रप्रसाद जैन याला वापरास देण्यात आले होते. कार्यालयावर रुपी बँकेने जप्ती नोटिस बजाविली होती.

मिस्त्री यांनी बँकेचे साडेबारा लाख रुपयांचे कर्ज फेडले होते. मात्र, रुपी बँकेतील अधिकाऱ्यांनी मिळकतीचे मूळ कागदपत्रे मिस्त्री यांना न देता राजेंद्रप्रसाद जैन यांना दिली होती. या कागदपत्रांचा वापर करून जैन यांनी एचडीएफसी बँकेच्या नाना पेठ शाखेत मिस्त्री यांच्या नावे खाते उघडले. या खात्याचा वापर कर्ज प्रकरणासाठी केला होता.'

# पिंपरी-चिंचवडला 'गव्हर्नन्स' पुरस्कार!

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : इंदौर येथे राष्ट्रपतींच्या हस्ते होणार सन्मान

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीच्या स्मार्ट सारथी ॲपने भारत सरकारच्या इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्डमध्ये "गव्हर्नन्स" श्रेणीमध्ये दुसरे स्थान पटकावले आहे. देशभरातील ८० पात्रताधारक शहरांमधून पिंपरी चिंचवडला "गव्हर्नन्स" पुरस्कार जाहीर झाला असून २७ सप्टेंबर २०२३ रोजी इंदौर (मध्यप्रदेश) येथे होणाऱ्या कार्यक्रमात भारताचे राष्ट्रपती महोदय यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी दिली आहे.**




पिंपरी चिंचवडने देश पातळीवरील दुसरा तर राज्यात पहिल्या क्रमांकाचे यश संपादन केले आहे. हे यश म्हणजे पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी एक गौरवाची बाब असून पुन्हा एकदा शहराच्या लौकीकात मानाचा तुरा रोवला गेला आहे, असेही सिंह म्हणाले. देशातील १०० स्मार्ट शहरांनी गतिशीलता, ऊर्जा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक जागा, सामाजिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट गव्हर्नन्सचे विस्तृत प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी स्मार्ट सिटीज मिशनच्या अंतर्गत, इंडिया स्मार्ट सिटीज अवॉर्ड कॉन्टेस्ट (आय.एस.ए.सी.) उपक्रम हाती घेतला आहे. देशभरातील ८० पात्रताधारक स्मार्ट शहरांमधून, इंडिया स्मार्ट सिटीज अवॉर्ड कॉन्टेस्ट २०२२ ला एकूण ८४५ नामांकन मिळाले होते. पाच मूल्यमापन टप्प्यांतून, विविध पुरस्कार श्रेणींमध्ये ६६ विजेते निवडले गेले. यामध्ये, प्रोजेक्ट अवॉर्ड ३५, इनोव्हेशन अवॉर्ड ६, राष्ट्रीय/झोनल सिटी अवॉर्ड १३, राज्य/केंद्रशासित प्रदेशातील ५ आणि भागीदार पुरस्कार श्रेणीतील ७ विजेत्यांना भारताचे मा.राष्ट्रपती सन्मानित करतील. इंडिया स्मार्ट सिटीज अवॉर्ड कॉन्टेस्टने २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये तीन आवृत्त्या आयोजित केल्या होत्या. चौथी आवृत्ती एप्रिल २०२२ मध्ये सूरतमधील 'स्मार्ट सिटीज-स्मार्ट अर्बनायझेशन' कार्यक्रमादरम्यान लॉन्च केली गेली. इंडिया स्मार्ट सिटीज अवॉर्ड कॉन्टेस्ट २०२२मध्ये दोन-टप्प्यांची सबमिशन प्रक्रिया वैशिष्ट्यीकृत आहे. 'पात्रता टप्पा', ज्यामध्ये शहराच्या कामगिरीचे एकंदर मूल्यांकन समाविष्ट आहे आणि 'प्रपोजल स्टेज', ज्यासाठी सहा पुरस्कार श्रेणींसाठी नामांकन आवश्यक आहे. या श्रेणींमध्ये १० थीमसह प्रोजेक्ट अवॉर्ड्स, २ थीम्ससह इनोव्हेशन अवॉर्ड्स, नॅशनल/झोनल सिटी अवॉर्ड्स, स्टेट अवॉर्ड्स, यूटी अवॉर्ड आणि ३ थीम्ससह पार्टनर अवॉर्ड्सचा समावेश आहे.

> "स्मार्ट सिटीज मिशन नाविन्यपूर्ण "स्मार्ट सोल्यूशन्स"द्वारे शहरातील नागरिकांना आवश्यक पायाभूत सुविधा, स्वच्छ आणि टिकाऊ वातावरण आणि सुधारित जीवनमान प्रदान करून शहरी विकास पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असून शहरी विकासात एक आदर्श बदल साध्य करण्याच्या ध्येयाकडे मिनशद्वारे महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहे. पीसीएमसी स्मार्ट सारथी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराच्या मदतीने सहभागी प्रशासनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सध्या सुमारे २ लाख ५० हजार वापरकर्ते ॲप, वेब पोर्टल आणि सोशल मीडिया चॅनेलद्वारे संवाद साधत आहेत. मासिक पोहोच सुमारे ५ ते ६ लक्ष आहे. पिंपरी चिंचवडने देश पातळीवरील दुसरा तर राज्यात पहिला क्रमांकाच्या पुरस्कारासाठी निवड झाल्याने ही एक गौरवाची बाब आहे.
> - **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

### नागरिकांचा सहभाग

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांपर्यंत माहितीचा सातत्यपूर्ण आणि वेळेवर प्रवाह राखण्यासाठी पीसीएमसी स्मार्ट सारथीने परस्पर संवादाचे सुधारित मार्ग खुले केले आहेत. शिवाय, पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप्लिकेशनने नागरिकांना गरजेच्या वेळी मदत करणे किंवा सामाजिकरित्या व्यस्त राहणे, मनपाद्वारे आयोजित क्रियाकलापांसाठी जबाबदार बनणे सोपे केले आहे. भविष्यात शहरातील विविध उपक्रमांसाठी स्वयंसेवक तयार करण्याचा प्रस्ताव दिला आहे. महानगरपालिका आपल्या रीअल-टाइम नोटिफिकेशन्सद्वारे नागरिकांना शहर-विशिष्ट कारणे/उपक्रम/मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी वृक्षारोपण मोहीम, रक्तदानासाठी स्वयंसेवा करणे आदी कामांसाठी मदत होणार आहे.**

### पिंपरी चिंचवड "स्मार्ट सारथी ॲप" डिजिटल नागरिकत्वाच्या दिशेने एक दूरदर्शी उपक्रम

**»"पीसीएमसी स्मार्ट सारथी" हे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.चे अधिकृत मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेब पोर्टल आहे. स्मार्ट सारथी हा पिंपरी चिंचवड महानगरपालिका च्या सहकार्याने पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.चा एक शाश्वत द्विमार्गी नागरिक सहभाग निर्माण करण्याचा उपक्रम आहे. शहराची एका ठोस, पूर्ण विकसित, एकात्मिक ई-गव्हर्नन्स प्रणाली म्हणून महापालिका आणि नागरिकांमधील द्वि-मार्गी संप्रेषण कार्यक्षमतेने व्यवस्थापित करते. पीसीएमसी स्मार्ट सारथी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे ई-गव्हर्नन्स, समुदाय प्रतिबद्धता समाविष्ट करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी सादर करण्यात आली आहे. याद्वारे विविध सेवा देण्याचे काम सध्या सूरू आहे.**

---

# 'मन की बात' मुळे समाजासाठी काम करण्याची मिळते प्रेरणा!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची प्रतिक्रिया

### शहरात ठिकठिकाणी 'मन की बात' लाईव्ह प्रक्षेपण

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**"संकल्प के सूरज चांद पर भी उगते हैं.." अशा शब्दांत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'चांद्रयान- ३' मोहीमेत यशस्वी झालेल्या शास्त्राज्ञांचे कौतूक केले. 'मन की बात' मुळे समाजासाठी आणखी सकारात्मक दृष्टीकोनातून काम करण्याची प्रेरणा मिळते, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली.**



पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचा १०४ व्या भागाचे शक्तिकेंद्र, बूथ आणि मंडलनिहाय लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. काकास इंटरनॅशनल स्कूल, तापकीरनगर येथे आयोजित कार्यक्रमात जगताप सहभागी झाले. यावेळी चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, सांगवी-काळेवाडी मंडल अध्यक्ष विनोद तापकीर, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, सविताताई खुळे, ज्योतीताई भारती, माजी स्वीकृत नगरसेवक संदिप नखाते, पुणे नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, ॲड. मंगेश नढे, हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, रमेश काळे, प्रकाश लोहार, भरत ठाकूर, कैलास सानप, विकास साठे, आकाश भारती, सचिन काळे, पंकज मिश्रा यांच्यासह भाजपा पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### तापकीरनगर येथे टिफीन बैठक...

» दरम्यान, काकास इंटरनॅशनल स्कुल, तापकीर नगर येथे प्रभाग क्रमांक 22 व 27 च्या वतीने 'टिफिन बैठक' पार्टीचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये 110 हून अधिक लोक उपस्थित होते. सांगवी- काळेवाडी मंडल अध्यक्ष विनोद तापकीर व बजरंग दल वकील आघाडीचे मंगेश नढे यांनी आयोजन केले. भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे आणि कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणखी सकारात्मक भूमिकेतून काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा देशवासियांसी होणारा सुसंवाद म्हणजे "मन की बात". आजच्या 'मन की बात'मध्ये मोदीजींनी "चांद्रयान-३" मोहीम यशस्वी करणाऱ्या शास्त्रज्ञांचा गौरव केला. देशवासीयांसाठी अभिमानास्पद अशी कामगिरी करणाऱ्या इस्त्रोच्या वैज्ञानिकांचा सन्मान केला. तसेच, सप्टेंबर महिन्यात राजधानी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या G - 20 साठी भारत देश संपूर्णपणे तयार असून तब्बल 40 देशांचे राष्ट्राध्यक्ष यामध्ये सहभागी होणार आहेत. **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड..




# चांदनी चौकातून: 'व्हायरल'

**सध्या प्रसारमाध्यमांमधून भाजपमधील तीन नेत्यांचं नाव सातत्याने घेतलं जातंय. मोदी, शहा आणि गडकरी! मोदी-शहांना कितीही नको असलं तरी वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 'व्हायरल' झालेले आहेत.**

गडकरींच्या रस्तेविकास मंत्रालयासंदर्भात महालेखापरीक्षकांनी (कॅग) दोन अहवाल दिले, मंत्रालयावर ताशेरे ओढले तरीही, गडकरींविरोधात राजकीय वातावरण तयार होऊ शकलेलं नाही. उलट, गडकरींना सहानुभूती मिळू लागली आहे! त्यामुळं 'कॅग'च्या अहवालावरच शंका घेतली जाऊ लागली आहे. ईडी-सीबीआयपाठोपाठ आता 'कॅग'चाही वापर केला जातोय का, असा प्रश्न हलक्या आवाजात विचारला जाऊ लागला आहे. गडकरींनी वेगवेगळ्या व्यासपीठांवरून प्रत्युत्तर देऊन शांतपणे हल्ला परतवून लावला आहे. 'कॅग'च्या अहवालावरून चर्चा होत असताना गडकरींच्या दोन चित्रफिती समाजमाध्यमांवरून व्हायरल झाल्या. समोर कोणीही असो, नमस्कार-चमत्कार न करताही विनम्र राहता येतं याचं भाजपच्या नेत्यांना शहाणपण देणाऱ्या चित्रफिती समाजमाध्यमांवर फिरत असताना, 'चंद्रयान-३'च्या यशानंतर 'इस्रो'च्या शास्त्रज्ञांशी गडकरींनी फोनवरून साधलेल्या संवादाची चित्रफीतही लोकांपर्यंत पोहोचली. गडकरींच्या दिल्लीतील निवासस्थानी सर्वपक्षीय नेते, मुख्यमंत्री, मंत्री यांचा राबता असतो. राज्या-राज्यांतील नेत्यांसाठी त्यांचे दारे नेहमीच खुली असतात. दोन दिवसांपूर्वी गडकरींनी तेजस्वी यादव यांना हायड्रोजन कारमधून फिरून येण्यास सांगितलं. भेटीमध्ये गप्पांच्या ओघात गडकरींनी नव्या तंत्रज्ञानावर आधारित या कारचं महत्त्व समजावून सांगितलं. तेजस्वी यादवही या स्वस्त, मस्त आणि प्रदूषणमुक्त कारच्या प्रेमात पडले. त्यांनी लगेच प्रसारमाध्यमांना बोलावून हायड्रोजन कारचं कौतुक केलं आणि गडकरींना धन्यवाद दिले. या कारमुळं तेजस्वी आणि गडकरी दोघेही व्हायरल झाले. समाजमाध्यमांच्या जमान्यात कोणालाही व्हायरल होण्यापासून रोखता येत नाही हेच खरं. काँग्रेसला २०१४ आणि २०१९ मध्ये समाजमाध्यमांची ताकद कळलेली नव्हती, भाजपचा खेळही समजलेला नव्हता. तेव्हा काँग्रेसविरोधात अख्खा भाजप व्हायरल झाला होता. समाजमाध्यमांवरील भाजपचा हल्ला परतवून लावला पाहिजे, हा सल्ला काँग्रेसच्या नेत्यांनी गांभीर्याने घेतलेला नव्हता. आता मात्र काँग्रेसला समाजमाध्यमांचं महत्त्व पटू लागलेलं आहे. वृत्तवाहिन्यांची विश्वासार्हता घटू लागल्याने भाजपनेही समाजमाध्यमांवरील तरुण इन्फ्लुएन्झर्सना हाताशी धरून नव्या सोंगट्या टाकलेल्या आहेत. भाजपला वृत्तवाहिन्यांची गरज उरली नसली तरी, वृत्तवाहिन्यांचं भाजपप्रेम कमी झालेलं नाही. त्यामुळं काँग्रेसने मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांना चार हात दूर ठेवण्याचं धोरण राबवलेलं आहे. 'भारत जोडो' यात्रेमध्ये वा त्यानंतरही राहुल गांधींनी प्रसारमाध्यमांना एकही मुलाखत दिलेली नाही. राहुल गांधींचा प्रतिमाबदल समाजमाध्यमांवरून केला जात आहे. सामान्य लोकांमध्ये मिसळून राहुल गांधींनी साधलेल्या संवादाचे कव्हरेज काँग्रेस स्वत:च करत आहे. राहुल गांधींच्या भेटीगाठी व्हायरल केल्या जात आहेत. लडाखमधील राहुल गांधींचा दौरा काँग्रेसने समाजमाध्यमांवरून व्हायरल केला. १० सप्टेंबरला लडाख स्वायत्त पहाडी विकास परिषदेची निवडणूक होणार असल्याने अचूक वेळ साधत राहुल गांधींचा दौरा आखला गेला. लडाखमध्ये बाइक-रॅली, जाहीर भाषण, स्थानिक लोकांशी संवाद हा जनसंपर्क अपेक्षित होता. पण, 'ब्रिक्स'च्या बैठकीत मोदी आणि क्षी जिनपिंग एकत्र आले असताना लडाखमध्ये चीनवरून भाजपच्या वर्मावर ठेवलेले बोट हे काँग्रेसचा अफलातून राजकीय डावपेच होते. काँग्रेसच्या या क्लृप्त्या जबरदस्त व्हायरल झाल्या. २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपच्या समाजमाध्यमांवरील मोदींच्या प्रतिमाबांधणीच्या क्लृप्त्या काँग्रेस नेत्यांच्या डोक्यावरून गेल्या होत्या. नंतरच्या काळात काँग्रेस भाजपच्या काकणभर पुढं सरकला असल्याचं दिसतंय. कदाचित त्यामुळंच समाजमाध्यमांवर स्टिफनी कटरचं नाव पुन्हा चर्चेत आलं असावं. राहुल गांधींशी तिची भेट २०२१ मध्ये झाली होती असं म्हणतात. त्यानंतर वायनाडच्या खासदाराच्या प्रतिमाबांधणीची आखणी झाली असावी!



## संपादकीय »

### बीमार अब उलझने..

*डॉक्टरांनी रुग्णास औषधांची नाममुद्रा नावे 'लिहून' देऊ नयेत, वैद्यकीय आयोगाने नाममुद्राधारी औषधांचा वापर बंद करून काय होते हे तपासले आहे का?*

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचा दुसरा निर्णय पाहिल्यावर पहिला जरा तरी बरा होता हे मान्य करावे लागते. तो पहिला निर्णय डॉक्टर आणि औषध कंपन्या यांच्यातील कथित लागेबांधे आणि भ्रष्टाचार मोडून काढण्यासंदर्भात होता. त्यावर 'पथ्य न करी सर्वथा' या शीर्षकाच्या संपादकीयात (२२ ऑगस्ट) भाष्य होते. आजच्या उत्तरार्धात वैद्यकीय आयोगाच्या दुसऱ्या निर्णयाविषयी.

तो जेनेरिक औषधांविषयी आहे. नाममुद्रा असलेली म्हणजे ब्रँडेड आणि केवळ सरसकट औषधनामे असलेली म्हणजे जेनेरिक औषधे यांचे फायदे-तोटे यावर चर्वितचर्वण करणे हा आपला नवा छंद. अलीकडच्या काळात उदयास आलेले नवनैतिकवादी या चर्चेत हिरिरीने उतरतात आणि नाममुद्राधारी औषध कंपन्या जणू पापी आहेत असे ठसवण्याचा प्रयत्न करतात. वैद्यकीय परिषदेचा ताजा निर्णय एक प्रकारे यास हातभार लावतो.

**कांद्याच्या बाबतीतले सरकारचे धरसोडीचे धोरण सध्या आपण सगळेच जण बघत आहोत. पण तांदूळ, गहू, डाळी या धान्यांच्या बाबतीतला अनुभवही फारसा वेगळा नाही. कांद्याच्या बाबतीतले सरकारचे धरसोडीचे धोरण सध्या आपण सगळेच जण बघत आहोत. पण तांदूळ, गहू, डाळी या धान्यांच्या बाबतीतला अनुभवही फारसा वेगळा नाही.**

# बेभरवशाचा निर्यातदार हीच ओळख!

काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पानिपत होण्यामागील प्रमुख कारणांपैकी महागाई एक कारण होते. आपले सरकार त्या अडचणीत अडकू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार प्रयत्नशील आहे. येत्या लोकसभा निवडणुकीपूर्वी आपल्या सरकारवर महागाईचे ढग घोंघावू नयेत यासाठी सरकार पटापट निर्णय घेत आहे. त्यातच जुलै महिन्यात किरकोळ महागाई निर्देशांक १५ महिन्यांतील उच्चांकी पातळीवर पोहोचल्याने केंद्राने असे निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे. मात्र यातील बरेचसे निर्णय शेतकरीविरोधी आणि केवळ तात्पुरती मलमपट्टी करणारे आहेत. यामुळे एका बाजूला अतिवृष्टी- दुष्काळ यांचा मार, तर दुसरीकडे उत्पादन कमी झाले तरी अन्नधान्याचे दर वाढू न देण्याचा सरकारचा अट्टहास या कात्रीत शेतकरी सापडला आहे. केंद्राने कांद्याच्या निर्यातीवर ४०% शुल्क लावल्यानंतर



राज्यात शेतकरी काही जिल्ह्यांत आक्रमक झाले. केंद्राच्या धोरणाबाबत चर्चा सुरू झाली. मात्र महागाई कमी करण्यासाठीच्या निर्णयांची सुरुवात मागील वर्षीच झाली. केंद्र सरकारने प्रथम गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली. त्यानंतर साखरेच्या निर्यातीवर मर्यादा आणली.

पाठोपाठ तुकडा तांदळाच्या (ब्रोकन राइस) निर्यातीवर बंदी घातली. तूर, उडीद अशा डाळींच्या आयातीवरील शुल्क काढून टाकले. सोयातेल आणि सूर्यफूल तेल यांच्यावरील आयात शुल्क काढण्यात आले. कापसाची काही महिने आयात शुल्काशिवाय आयात करण्यास परवानगी दिली. गव्हाचा साठा करण्यावर मर्यादा घातली. मागील महिन्यात बिगर बासमती पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली. ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवीन गळीत हंगामात साखरेच्या निर्यातीला परवानगी मिळणार नसल्याचे सरकारने संकेत दिले आहेत. संकटकाळी बांधावर : शेतमालाचे दर पाडण्यासाठी सरकार सध्या एकापाठोपाठ एक निर्णय घेत आहे. पण ते पडत असताना सरकार बघ्याच्या भूमिकेत होते. टोमॅटो आणि कांदा यांचे दर या वर्षीच्या पूर्वार्धात मोठ्या प्रमाणात पडले. त्या वेळी केंद्राने कुठलीही मदत केली नाही. भविष्यात दर वाढले तर ग्राहकांना झळ बसू नये यासाठी केवळ अडीच लाख टन कांदा केंद्राने खरेदी केला. देशाचे एकूण ३१७ लाख टन उत्पादन लक्षात घेतले तर ही खरेदी एक टक्काही नाही. सध्या पावसाने दडी मारल्याने कर्नाटक आणि महाराष्ट्रात खरिपातील कांद्याच्या क्षेत्रात मोठी घट झाली आहे. कांद्याचे दर हळूहळू वाढू लागले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गद्दारांनी घात केला नसता तर!

## महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आणला असता : ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्ही ज्यांना नाग समजून त्यांची पुजा केली तेच उलटे होऊन आम्हाला डसले, या गद्दारांनी घात केला नसता तर महाराष्ट्र देशात नव्हे तर जगात पहिल्या क्रमांकावर आणला असता असा विश्वास माजी मुख्यमंत्री तथा ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी ता. 27 हिंगोलीच्या सभेत व्यक्त केला. यावेळी त्यांनी केंद्र व राज्यावर सडकून टीका केली.**

येथील रामलिला मैदानावर आयोजित निर्धार सभेस माजी मंत्री आदित्य ठाकरे शिवसेना नेते तथा खासदार विनायक राऊत, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, सुभाष वानखेडे, जिल्हा संपर्कप्रमुख बबन थोरात, माजी मंत्री डॉक्टर जयप्रकाश मुंदडा, जिल्हाध्यक्ष विनायक भिसे पाटील, संदेश देशमुख, माजी आमदार संतोष टारफे, राजेश पाटील गोरेगावकर उपस्थित होते. यावेळी ठाकरे म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांचे महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष केले जात आहे. राज्यात शासन आपल्या दारी हा कार्यक्रम राबवित आहे. मात्र शासन आल्या दारी थापा मारतोय लय भारी अशी स्थिती सरकारची आहे. शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे पैसे अजून मिळाले नाहीत. नुकसान भरपाई मिळालेली नाही. केंद्र व राज्य सरकारी केवळ थापा मारत आहेत. आता गद्दारांची सुलतानी आली असून हे संकट मोठे असल्याचे त्यांनी सांगितले. जे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे ते चिरडून टाकण्याचा सरकारचा उद्योग सुरु असल्याचा आरोप त्यांनी केला. एका अधिकाऱ्याने शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी 25 हजार रुपये देण्याचा अहवाल सरकारला दिला. मात्र पैसे तर मिळालेच नाही उलट अधिकाऱ्याला स्वेच्छा सेवानिवृत्ती घ्यावी लागली ही शेतकऱ्याची बाजू घेण्याची भेट असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर टीका केली. डबल इंजीन सरकारला अजित पवारांचा डबा लागला. आता मालगाडी करणार काय, इतर पक्षातील नेते तुम्ही पक्षात घेताय, तुमच्या पक्षात कर्तृत्ववान नेते नाहीत काय असा सवाल त्यांनी भाजपावर टीका करतांना उपस्थित केला. भाजपामध्ये मागील अनेक वर्षापासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर उपरे आणून बसविले जात असून त्यांची किव येत असल्याचे त्यांनी सांगितले. घर घर मोदी योजनेमध्ये केंद्राच्या योजना प्रत्येक घरी जाऊन सांगणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांनी त्याची सुरवात आपल्या घरापासून करावी म्हणजे योजना प्रत्येक घरी पोहोचल्या काय हे कळेल असेही त्यांनी सांगितले. इंडिया ही देशभक्तांची एकजूट आहे. देशातील लोकशाही वाचविण्यासाठी एकत्र आल्यानंतर पंतप्रधानांनी आमची तुलना इंडियन मुजाहिदीन बरोबर केली. मग वर्ल्ड कपचा भारत पाकिस्तानचा सामना गुजरात मध्ये नरेंद्र मोदी स्टेडीयमवर कसा चालतो असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्हाला देशप्रेमाचे धडे शिकवू नका असे त्यांनी यावेळी ठणकावले. केंद्र शासनाच्या सबका साथ सबका विकास हा नारा दिला, पण निवडणुक झाल्यानंतर सबको लाथ अन दोस्तांचा विकास हे उद्योग केले आहेत. भाजपाला आमची घराणेशाही संपवायची असेल तर आम्हालाही त्यांची मित्रशाही संपवायची आहे. भ्रष्टाचाराबद्दल बोलण्याचा भाजपाला अधिकार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजपाच्या रक्षाबंधन कार्यक्रमावर टिका करतांना ठाकरे म्हणाले की, गुजरातमधील बिल्कीस बानो तसेच मणिपुरमध्ये अत्याचार झालेल्या महिलांकडून राखी बांधून घ्यावी असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. आम्ही हिंदू आहोत, देशद्रोह्यांच्या विरोध करतो. देशाच्या मुळावर आलेल्यांना भर चौकात फाशी दिली पाहिजे हे आमचे राष्ट्रीयत्व आहे. केंद्र सरकार कुरुलकरला फाशी देणार का सोडून देणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बीआरएसने त्यांची भुमीका स्पष्ट करावी असे आवाहन त्यांनी केले.



### आता मालगाडी करणार काय ?

» डबल इंजीन सरकारला अजित पवारांचा डबा लागला. आता मालगाडी करणार काय, इतर पक्षातील नेते तुम्ही पक्षात घेताय, तुमच्या पक्षात कर्तृत्ववान नेते नाहीत काय असा सवाल त्यांनी भाजपावर टीका करतांना उपस्थित केला. भाजपामध्ये मागील अनेक वर्षापासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर उपरे आणून बसविले जात असून त्यांची किव येत असल्याचे त्यांनी सांगितले. घर घर मोदी योजनेमध्ये केंद्राच्या योजना प्रत्येक घरी जाऊन सांगणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांनी त्याची सुरवात आपल्या घरापासून करावी म्हणजे योजना प्रत्येक घरी पोहोचल्या काय हे कळेल असेही त्यांनी सांगितले.

# मी मटका चालवतो का गुटखा चालवतो!

## आमदार संतोष बांगरांचे उद्धव ठाकरेंना सडेतोड प्रत्युत्तर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बारा वर्षापासून मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख म्हणून काम पाहिले. तेव्हा उद्धव ठाकरे यांना समजले नाही का, मी मटका चालवतो की गुटखा चालवतो का अन्य काही करतो. तेव्हा तर ते मला हिंदुत्वाचा शेर म्हणायचे. बाळासाहेबांचा गुंड म्हणायचे. आणि आता माझ्यावर टीका का करता. पण मी एवढा मोठा झालो नाही की, उद्धव ठाकरे साहेबांवर बोलेन, असे म्हणत आमदार संतोष बांगर यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.**

आमदार संतोष बांगर म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी आजच्या सभेत माझाच गौरव केला आहे. माझ्यावर टीका करायची. दुसरे म्हणजे मोदी साहेबांवर टीका करायची. म्हणजे मोदी साहेब यांच्या लाईनीत मलाही आणून त्यांनी माझाच गौरव केला, असे मत बांगर यांनी मांडले. उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोलीतील जाहीर सभेतून आमदार संतोष बांगर यांच्यावर घणाघाती टीका केली आहे.

ज्या गद्दाराला आपण नाक समजून पूजा केली, उलट तोच आपल्यालाच डसायला लागला. तुला पुंगी वाजवली तुला दूध पाजले. मटक्याचे अड्डे चालवणाऱ्या हिंदुत्ववादी मानायचे का, उद्धटपणा येथे चालणार नाही, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी बांगर यांचा समाचार घेला. दरम्यान उद्धव ठाकरे म्हणाले की, श्रावण महिना सुरू झाला आहे. नागपंचमी झाली. गद्दारांना साप समजून पूजायाला लागलो. पायाखाली साप आला तर शेतकऱ्यांना काय करायचे हे माहीत आहे. अवैध धंदे करणारा हिंदू असेल का, असू शकतो? हिंगोलीचे गद्दार उद्धटपणा करतात, त्यांना गाडून टाका, अशी टीका उद्धव ठाकरे हिंगोलीच्या सभेतून केली आहे. मराठवाडा ही संतांची भूमी आहे, या मराठवाड्याने गद्दारांना कधीही साथ दिली नाही, हा इतिहास आहे. मराठवाड्यात गद्दार गाडले जातील, असा इशारा ठाकरे गटाचे नेते, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिला आहे. दरम्यान अंबादास दानवे पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना सभेसाठी येण्यासाठी गाड्या लावाव्या लागत नाही. काही जण हिंगोलीत कावड यात्रा श्रद्धेसाठी नाही तर स्वतःची मार्केटिंग व्हावी म्हणून काढणारे आमदार आहेत, असे म्हणत संतोष बांगर यांच्यावर अंबादास दानवे यांनी टीकास्त्र डागले आहे. हिंगोली जिल्ह्यातील दोन नंबरचे धंदे करा म्हणत युवकांना तयार करणाऱ्या नेत्याच्या तावडीत हा जिल्हा अडकला आहे असे म्हणत अंबादास दानवे यांनी जोरदार टीकास्त्र डागले आहे.



### काय म्हणाले होते उद्धव ठाकरे

» उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोलीतील जाहीर सभेतून आमदार संतोष बांगर यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. ज्या गद्दाराला आपण नाक समजून पूजा केली, उलट तोच आपल्यालाच डसायला लागला. तुला पुंगी वाजवली तुला दूध पाजले. मटक्याचे अड्डे चालवणाऱ्या हिंदुत्ववादी मानायचे का, उद्धटपणा येथे चालणार नाही, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी बांगर यांचा समाचार घेला दरम्यान उद्धव ठाकरे म्हणाले की, श्रावण महिना सुरू झाला आहे. नागपंचमी झाली. गद्दारांना साप समजून पूजायाला लागलो. पायाखाली साप आला तर शेतकऱ्यांना काय करायचे हे माहीत आहे. अवैध धंदे करणारा हिंदू असेल का, असू शकतो? हिंगोलीचे गद्दार उद्धटपणा करतात, त्यांना गाडून टाका, अशी टीका उद्धव ठाकरे हिंगोलीच्या सभेतून केली आहे.

# दलित अत्याचारावर पंतप्रधानांचे मौन!

## » मध्य प्रदेशातील दलित हत्याकांडावर खरगेंची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मध्य प्रदेशच्या सागर जिल्ह्यात दलित तरुणाच्या हत्येवरून मायावतींनंतर आता काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी भाजपला घेरले आहे. त्यांनी रविवारी सकाळी ट्विट करून लिहिले, 'मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यात एका दलित तरुणाची हत्या करण्यात आली. गुंडांनी त्याच्या आईलाही सोडले नाही.**

सीएम शिवराज आणि पीएम मोदींसाठी त्यांनी लिहिले, 'सागरमध्ये संत रविदास मंदिर बांधण्याचे नाटक करणारे पंतप्रधान मध्य प्रदेशात सातत्याने होत असलेल्या दलित-आदिवासी अत्याचार आणि अन्यायावर अवाक्षरही काढत नाहीत. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री केवळ कॅमेरासमोर वंचितांचे पाय धुवून आपला गुन्हा लपवण्याचा प्रयत्न करतात. पण, भाजपने मध्य प्रदेशला दलित अत्याचाराची प्रयोगशाळा बनवले आहे. खरगे पुढे लिहितात, 'भाजपशासित मध्य प्रदेशात दलितांवरील गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

तसेच राष्ट्रीय सरासरीच्या तिप्पट आहे. मोदीजी, यावेळी मध्य प्रदेशातील जनता भाजपच्या जाळ्यात अडकणार नाही, समाजातील वंचित आणि शोषित वर्गाच्या व्यथांचं उत्तर तुम्हाला काही महिन्यांनंतर मिळेल. भाजपला निरोप निश्चित आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अरुण यादव यांनी ट्विट केले, 'सिधीमध्ये भाजप आमदार केदार शुक्ला यांच्या प्रतिनिधीने आदिवासी तरुणावर लघवी केली, आता खुरईमध्ये मंत्री भूपेंद्र सिंह यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या कुटुंबीयांसह दलित तरुणाला बेदम मारहाण केली. गुन्हेगारांना भाजपचे संरक्षण आहे.

हत्येतील आरोपी कोमलसिंग ठाकूर रा. बडोदिया नौनगर याची खुराई कृषी उत्पन्न बाजारात प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. दोन वर्षांपूर्वी भूपेंद्र सिंह यांनी बाजार सचिवांना पत्र लिहिले होते. दिग्विजय सिंह यांनी शनिवारी या घटनेवर ट्विट केले की, 'सागरमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या गरीब लोकांवर भाजपचे अत्याचार वाढत आहेत. संत रविदासजी महाराजांचे मंदिर बांधून या गोरगरिबांना फायदा होणार नाही. त्यांना अधिकार दिले पाहिजेत. रक्षाबंधनाला मी स्वतः या कुटुंबाला भेटायला जाणार आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी. हे प्रकरण 24 ऑगस्टच्या रात्रीचे आहे. सागरच्या बडोदिया नौनागीर गावात दलित तरुण लालू ऊर्फ नितीन अहिरवार (18) याची निर्घृण हत्या करण्यात आली. मुलाला वाचवण्यासाठी आलेल्या आईला विवस्त्र करून मारहाण करण्यात आली. पोलिसांनी नऊ जण आणि तीन ते चार अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. मुख्य आरोपी विक्रम सिंह ठाकूर (41), आझाद ठाकूर (36), इस्लाम खान (37), सुशील कुमार सोनी (36), अनीस खान (28), फरीम खान (22), अभिषेक रकवार (18) आणि अरबाज खान (18) 19)) यांना अटक करण्यात आली आहे. सर्व बडोदिया नौनागीर येथील रहिवासी आहेत. फरार आरोपी कोमलसिंग ठाकूर व इतरांचा शोध सुरू आहे.




### रक्षाबंधनाला पीडित कुटुंबाला भेटणार

» दिग्विजय सिंह यांनी शनिवारी या घटनेवर ट्विट केले की, 'सागरमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या गरीब लोकांवर भाजपचे अत्याचार वाढत आहेत. संत रविदासजी महाराजांचे मंदिर बांधून या गोरगरिबांना फायदा होणार नाही. त्यांना अधिकार दिले पाहिजेत. रक्षाबंधनाला मी स्वतः या कुटुंबाला भेटायला जाणार आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी.

# नूहमध्ये यात्रेला परवानगी नाही!

## » उद्या शाळा, महाविद्यालये आणि बँका बंद राहणार आहेत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर म्हणाले की, 28 ऑगस्ट रोजी नूह येथील ब्रजमंडल यात्रेला परवानगी देण्यात आलेली नाही. नूह येथे महिनाभरापूर्वी हिंसक घटना घडली आहे, त्याबाबत दक्षता घेण्याची गरज आहे. प्रत्येकाला मंदिरात पूजा करण्याचा अधिकार आहे. आम्ही लोकांना यात्रा टाळण्याचे आणि स्थानिक मंदिरांमध्ये प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे. सुरक्षा पुरवणे ही सरकारची जबाबदारी आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. यापूर्वी प्रशासनानेही यात्रेला परवानगी नाकारली आहे. नूहमध्ये कलम 144 लागू करण्यात आले आहे. शाळा-कॉलेज आणि इंटरनेट 28 ऑगस्टपर्यंत बंद आहे.**

नुह येथील ब्रजमंडल यात्रेवर विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते विनोद बन्सल म्हणाले – 28 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता यात्रा सुरू होईल. प्रवासाची परवानगी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हा सावनचा शेवटचा सोमवार असून प्रत्येक भक्ताला त्याच्या आवडीचा जलाभिषेक करण्याचा अधिकार आहे. ते म्हणाले की, हा धर्मनिष्ठ देश आहे, येथे कोणत्याही यात्रेसाठी परवानगी घेतली जात नाही. कुंभसाठी कधी परवानगी घेतली जाते का, असा सवाल त्यांनी केला. नूहमध्ये पुन्हा ब्रजमंडल यात्रेची घोषणा झाल्यानंतर सीएम मनोहर लाल यांनी डीजीपी शत्रुजित कपूर आणि सीआयडी प्रमुख एडीजीपी आलोक मित्तल यांच्यासोबत 2 तास बैठक घेतली. नूहमधील सद्यस्थिती आणि यात्रा काढल्यास गुप्तचर माहिती यावर तिघांमध्ये चर्चा झाली.

31 जुलैच्या हिंसाचारात पोलीस आणि सीआयडी यांच्यातील समन्वयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. एका सीआयडी निरीक्षकाने दावा केला होता की त्यांनी हिंसाचाराच्या संशयाचे इनपुट पाठवले होते. मात्र, त्यांना काहीही माहिती मिळाली नसल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. यानंतर गृहमंत्री अनिल विज यांनीही या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश गृह सचिवांना दिले. डीजीपी शत्रुजीत कपूर यांनी 5 राज्यांची बैठक घेतली असून सीमेवर अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

यासोबतच हरियाणा पोलिसांना सोशल मीडियावर दररोज पाळत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, हरियाणाचे गृह आणि आरोग्य मंत्री अनिल विज यांनी यात्रा काढण्याच्या घोषणेवर सांगितले की, सध्या असे काही नाही. यात्रा झाली तर आमची व्यवस्था पूर्ण आहे. तसे, तेथे नेहमीच पोलिस तैनात असतात. नूहच्या सर्व सीमा सील करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी 57 विशेष कर्तव्यदंडाधिकारी नेमण्यात आले आहेत. पोलिस अधिकारी सतत बैठका घेत आहेत, ज्यामध्ये फरिदाबादचे विभागीय आयुक्त, एडीजीपी ममता सिंह, नोडल अधिकारी अजित बालाजी जोशी, डीसी धीरेंद्र खडगाता, एसपी नरेंद्र बिजार्निया, 31 जुलैपासून नूहमध्ये तळ ठोकून असलेले अनेक अधिकारी सहभागी होत आहेत. जिल्ह्याच्या सीमेवर पोलिसांव्यतिरिक्त आरएएफ आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात केले जात आहेत. सायंकाळी संपूर्ण जिल्ह्यात ध्वज मार्च काढण्याची तयारी सुरू आहे. 28 ऑगस्ट रोजी शाळा-कॉलेज आणि इतर शैक्षणिक संस्था बंद राहतील. यासोबतच बँकाही बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 28 रोजी काढण्यात येणाऱ्या संभाव्य जलाभिषेक यात्रेच्या वेळी सतर्कतेमुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे डीसी धीरेंद्र खरगटा यांनी सांगितले.

यापूर्वी पोलिसांनी आरोपी अमीर रहिवासी धिडारा तावडू याला 21 ऑगस्ट रोजी रात्री 10:30 वाजता आणि आरोपी मुनफेड रहिवासी गावरका याला 10 ऑगस्ट रोजी पहाटे 5 वाजता पोलीस चकमकीनंतर अटक केली होती. हरियाणातील नूहमध्ये इंटरनेट सेवा पुन्हा बंद करण्यात आली आहे. गृह विभागाने शनिवारी दुपारी 12 ते 28 ऑगस्टच्या मध्यरात्री 12 पर्यंत जिल्ह्यात मोबाईल इंटरनेट सेवा आणि बल्क एसएमएसवर बंदी घातली आहे.



### हिंसाचारात आतापर्यंत 3 चकमकी

» नूह हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत 3 एन्काउंटर केले आहेत. यामध्ये हिंसाचाराशी संबंधित तीन गुन्हेगारांना गोळ्या घालण्यात आल्या आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. 24 ऑगस्ट रोजी नूह हिंसाचाराशी संबंधित अन्य आरोपींसोबत नूह पोलिसांनी चकमक केली होती. नूह हिंसाचार प्रकरणातील आरोपी ओसामा उर्फ पहेलवान याला रात्री उशिरा 11 वाजता पोलीस चकमक झाल्यानंतर अटक करण्यात आली आहे.

# मीरा जोशीने घेतलं नवीन घर!

मराठी मनोरंजन विश्वात अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी स्वतःचं स्थान निर्माण केलंय. मराठी मनोरंजन विश्वातील अभिनेत्री प्राजक्ता माळीने काहीच दिवसांपुर्वी कर्जतला स्वतःचं नवीन घर घेतलं.

आता प्राजक्ता नंतर आणखी एका मराठी अभिनेत्रीने स्वतःचं आलिशान घर घेतलंय. ही अभिनेत्री म्हणजे मीरा जोशी. मीरा जोशीने पुण्यात स्वतःचं घर विकत घेतलंय. मीराच्या नवीन घरातील गृहप्रवेशाचे फोटो व्हायरल झाले आहेत. मीराने सोशल मिडीयावर काही फोटो पोस्ट केलेत. या फोटोत मीराचा भाऊ सलील जोशी, आई स्मिता जोशी आणि तिचे बाबा दिसत आहेत.



मीराने पुण्यातील नवीन घरात पुजा करत गृहप्रवेश केलाय. मीराच्या हातात कलश दिसुन येतोय. नवीन घर घेतल्याने मीरा आणि तिचं संपूर्ण कुटुंब खुप आनंदात आहे. मीरा काही दिवसांपुर्वी सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. आपण प्रेमात पडल्याचं तिने सांगितलं आहे.

तिने तिच्या बॉयफ्रेंडसोबतचे काही फोटोही शेअर केले होते. या फोटोत समुद्रकिनाऱ्यावर उभे आहेत. तर तिचा बॉयफ्रेंड पाठमोरा उभा आहे. तिने त्याचा चेहरा दाखवला नसल्याने तो नेमका कोण आहे याची उत्सुकता सगळ्यांनाच लागून राहिली आहे. मीराने उरण समुद्रकिनाऱ्यावरचे फोटो शेअर केले आहेत. तिने तिच्या प्रियकराचा चेहरा आणि नाव गुदस्त्यात ठेवलं असलं तरी चाहते तिच्यासाठी प्रचंड आनंदी आहेत. अभिनेत्री ऋतुजा बागवे, मेघना एरंड अशा अभिनेत्रींनी मीराचं अभिनंदन केलंय. मीराने ही उत्तम अभिनेत्री आणि डान्सर आहे. अभिनेत्री मीरा जोशी हिचा मुंबई पुणे द्रुतगती मार्गवार अपघात झाला आहे. या संदर्भात अभिनेत्रीने स्वतः सोशल मिडियावर पोस्ट सह शेयर करत माहिती दिली आहे.

या अपघातात अभिनेत्रीला फारशी इजा झाली नसली तरी तिच्या गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. तिची गाडी दुभाजकावर धडकल्याने गाडीला जबर फटका बसला आहे. अभिनेत्रीने गाडीचे काही फोटो आणि एक व्हिडिओ शेयर करत या अपघताची माहिती दिली

# हेमांगी कवीचा माफीनामा

मराठी मनोरंजन विश्वातील एक कायम चर्चेत राहणार नाव म्हणजे हेमांगी कवी. तिने अनेक मालिका, चित्रपट, नाटकाद्वारे अभिनयाची छाप सोडली आहे. हेमांगी अभिनयासोबतच अनेक वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत असते. खास करुन हेमांगी तिच्या पोस्टसाठी चर्चेत असते. ती तिच्या अभिव्यक्तीच्या आधारावर अत्यंत परखडपणे तिचे पुरोगामी विचार लोकांपर्यंत पोहचवते. ती कायमच सोशल मीडियावर सक्रिय असते. हेमांगी कवीने काल तिचा 35 वा वाढदिवस साजरा केला आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त तिच्या चाहत्यांनी तिच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला होता. अनेक कलाकार मंडळींनी देखील पोस्ट शेयर करत तिला शुभेच्छा दिल्या. वाढदिवशी हेमांगी खुपच व्यस्त होती मात्र तिने आत्ता सोशल मीडियावर चाहत्यांसाठी खास पोस्ट शेयर केली आहे. तिचे काही फोटो शेयर केले आहेत. यात ती इंडो-वेस्टर्न लूकमध्ये दिसतेय. फोटो शेयर करत तिने लिहिले की, काल तुम्ही माझ्या वाढदिवसानिमित्त वेळात वेळ काढून मला शुभेच्छा देण्यासाठी MSGS, PHONE CALLS, DMS केले त्यासाठी मी तुमचे आभार मानते. काहींचे CALLS मी घेऊ शकले नसेन, MSGS वाचू शकले नसेन, REPLY देऊ शकले नसेन, TAGS पाहू शकले नसेन, STORIES REMENTION करू शकले नसेन तर मोठ्या दिलानं तुम्ही मला माफ कराल अशी मी आशा करते." पुढे ती लिहिते की, "कालचा दिवस खरंच तुमच्या शुभेच्छांमुळे खास बनला. असंच प्रेम करत रहा, आशीर्वाद देत रहा! पुन्हा एकदा खुप खुप धन्यवाद! त. टी.: वाढदिवस काल म्हणजे २६ ऑगस्टला होता, आज नाही याची कृपया मंडळाने नोंद घ्यावी!"



# जेलरची ३०० कोटी क्लबमध्ये एन्ट्री !

सध्या भारतीय सिनेमा विश्वावर 90'S च्या अभिनेत्यांचा बोलबाला आहे. सनी देओलच्या गदर 2 ने बॉक्स ऑफीसवर बक्कळ कमाई केली. तर दुसरीकडे रजनीकांतच्या जेलरने बॉक्स ऑफीसवर धुमाकुळ घातलाय. आता जेलर यशस्वी झाल्यावर रजनीकांतने सक्सेस पार्टी दिलीय. रजनीकांतने केक कापून आगामी सिनेमाच्या तयारीला लागलंय. 10 ऑगस्टला प्रदर्शित झालेल्या रजनीकांतच्या जेलरने बॉक्स ऑफिसवर आतापर्यंत 300 कोटींची कमाई केली आहे. या चित्रपटाने अनेक विक्रमही मोडले आहेत. चाहत्यांसोबतच रजनीकांतही आपल्या चित्रपटाच्या यशाने खूश आहेत. नुकतंच त्याने हे यश साजरं केलंय. रजनीकांत यांनी 'जेलर'च्या टीमसोबत केक कापून धूमधडाक्यात सेलिब्रेशन केले. रजनीकांतच्या जेलरने 2023 मधील तमिळ सिनेमातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. रजनीकांतच्या जेलरने 'पोनियिन सेल्वन 2'लाही मागे टाकले आहे. 'जेलर'च्या यशाचा आनंद साजरा करताना रजनीकांतच्या फोटोंनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. याशिवाय ट्विटरवर थलैवर 170 ट्रेंड करण्यास सुरुवात केली. थलैवर 170 हा रजनीकांतचा पुढचा चित्रपट आहे, ज्याची घोषणा नुकतीच रजनीकांतने केली आहे. टीजे ज्ञानवेल या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. सध्या या चित्रपटाचे नाव फायनल नाही, त्यामुळे सध्या 'थलैवा 170' असे म्हटले जात आहे. त्याचे झाले असे की, रजनी यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतली. त्या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मात्र रजनी यांनी त्या भेटी दरम्यान योगी यांच्या पाया पडतानाचे फोटोही सोशल मीडियावर आले.



# ह्यांचं सगळं ओक्केमध्ये एकदम!

मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचं ब्रेकअप झाल्याच्या चर्चा सध्या सोशल मिडीयावर सुरु होत्या. या दोघांनी एकमेकांच्या नातेवाईकांना अनफॉलो केल्याने दोघांच्या ब्रेकअपच्या बातम्यांमध्ये खरंच काहीतरी तथ्य आहे, अशी चर्चा सुरु झाली. पण आता या सर्व अफवा असल्याचं समजतंय. आता हे दोघे सार्वजनिक ठिकाणी स्पॉट झाल्याने या सर्व अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. ते अजूनही एकत्र आहेत आणि सर्व काही ठीक आहे. रविवारी अर्जुन आणि मलायका एकत्र स्पॉट झाले होते. रविवारी मुंबईत पाऊस पडत असताना मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर जेवणासाठी बाहेर गेले होते. दोघांनी एकत्र जेवण केले आणि जेव्हा दोघे बाहेर आले तेव्हा पापाराझींनी त्यांना स्पॉट केले. यादरम्यान दोघेही काही न बोलता थेट त्यांच्या गाडीत बसले. दोघांनाही असे एकत्र पाहून चाहत्यांनीही कमेंट बॉक्समध्ये प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. काहींनी सांगितले की देवाचे आभार मानतात की दोघे एकत्र आहेत आणि त्यांचे ब्रेकअप झाले नाही. त्याचवेळी एका यूजरने मलायका अरोराच्या व्हाइट कलरच्या आउटफिटचे कौतुक केले.

# भारताने रचला इतिहास!

## » पुरुष संघ 4×400 रिलेमध्ये फायनलला पोहोचला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**हंगेरीतील बुडापेस्ट येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारतीय खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भारताच्या पुरुष संघाने या चॅम्पियनशिपच्या 4×400 मीटर रिले शर्यतीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय संघ प्रथमच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे.**




जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२३मध्ये भारताला आतापर्यंत एकही पदक मिळालेले नाही. यावेळी देश नीरज चोप्राची वाट पाहत होता. दरम्यान, भारतीय पुरुषांच्या 4×400 मीटर रिले संघाने शनिवारी चमकदार कामगिरी केली आणि भारतासाठी आणखी एका पदकाच्या आशा उंचावल्या. भारतीय पुरुष रिले संघाने 4×400 मीटर स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. भारतासाठी हा एक ऐतिहासिक क्षण होता. मोहम्मद अनस याहिया, अमोज जेकब, मोहम्मद अजमल वरियाथोडी आणि राजेश रमेश यांच्या भारतीय संघाने हीट १ मध्ये धाव घेतली आणि दुसरे स्थान मिळविले. मुहम्मद अनास याहिया, अमोज जेकब, मुहम्मद अजमल वरियाथोडी आणि राजेश रमेश या भारतीय चौकडीने हे संस्मरणीय यश मिळवले. भारतीय पुरुष संघाने 4×400 मीटर रिले शर्यतीत २:५९.०५ अशी वेळ नोंदवून आशियाई विक्रम मोडला.

यापूर्वीचा विक्रम जपानच्या खेळाडूंच्या नावावर होता (२ मिनिटे ५९:५१ सेकंद). भारतीय संघाने अमेरिकेनंतर दुसरे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. अव्वल स्थानावर राहून अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या अमेरिकेविरुद्ध भारताला हीट-१ मध्ये ठेवण्यात आले होते. अमेरिकन खेळाडूंनी ही शर्यत दोन मिनिटे ५८.४७ सेकंदात पूर्ण केली. भारत शर्यतीत ग्रेट ब्रिटन आणि बोत्सवानासारख्या संघांपेक्षा पुढे होता, ही कामगिरी आश्चर्यकारक होती.

जमैका (२:५९:८२ सेकंद), फ्रान्स (३:००:०५ से.) आणि इटली (३:००:१४ से.) आणि नेदरलँड (३:००:२३ से.) यांनी हीट-२ मधून अंतिम फेरीत प्रवेश केला. या रिले शर्यतीत भारताकडून संथ सुरुवात झाली होती.

मोहम्मद अनस याहियाने संघाला संथ सुरुवात करून दिली. पहिल्या फेरीनंतर भारत सहाव्या क्रमांकावर होता. यानंतर अमोज जेकबने संघाचा वेग वाढवला आणि भारताला दुसऱ्या स्थानावर नेले. यानंतर मोहम्मद अजमल वरियाथोडी आणि राजेश रमेश यांनी आपल्या उत्कृष्ट वेगाच्या जोरावर शेवटच्या दोन टप्प्यात भारताला क्रमांक एकवर ठेवत अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. अशाप्रकारे इतिहास रचत भारतीय रिले संघाने प्रथमच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

### राजेश रमेशची चांगली कामगिरी

» पहिल्या टप्प्यानंतर भारत सहाव्या स्थानावर होता पण अमोजच्या शानदार धावाने त्याला दुसऱ्या स्थानावर नेले. अजमल आणि राजेश रमेश यांनी केवळ ती आघाडी कायम राखण्यात चांगली कामगिरी केली आणि संघाला २:५९.०५ सेकंदाचा नवा आशियाई विक्रम प्रस्थापित करण्यात मदत केली. भारतीय चौकडी या शर्यतीत पहिले स्थान घेईल असे क्षणभर वाटत होते, पण ते दोन सेकंदांनी हुकले. यापूर्वी रिले शर्यतीत पुरुषांचा आशियाई विक्रम २:५९.५१ सेकंद होता, जो जपानी संघाने बनवला होता. पण आता हा विक्रम भारतीय संघाच्या नावावर आहे. अंतिम फेरीत पोहोचलेल्या देशांच्या यादीतही भारतीय संघ दुसऱ्या स्थानावर आहे. पुरुषांच्या 4×400 मीटर रिले शर्यतीचा अंतिम सामना रविवारी रात्री खेळवला जाईल.

# बांगलादेशच्या अडचणी वाढल्या!

## » इबादत हुसेन खेळाडू होणार नाही सहभागी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषक २०२३ स्पर्धा ३० ऑगस्ट ते १७ सप्टेंबर दरम्यान हायब्रीड मॉडेल अंतर्गत श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये खेळवली जाणार आहे. बांगलादेशचा स्टार फलंदाज लिटन दास आजारपणामुळे २०२३ आशिया चषकासाठी श्रीलंकेला जाणाऱ्या बांगलादेशी संघाचा भाग असणार नाही. याबाबत बीसीबीच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. त्यामुळे आता पुन्हा बांगलादेश संघाच्या अडचणी वाढल्या आहेत.**



### अंतिम फेरीत स्थान मिळण्याची आशा

» दुसरीकडे, संघाचा वेगवान गोलंदाज तस्किन अहमद याने आशिया चषकाबाबत सांगितले की, बांगलादेशला स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळण्याची आशा आहे. आशिया चषक स्पर्धेत खेळल्याने आपल्या संघाला भारतात होणाऱ्या आगामी विश्वचषक स्पर्धेच्या तयारीसाठी खूप मदत होईल, असा विश्वास या वेगवान गोलंदाजाला आहे.

बांगलादेश गतविजेत्या श्रीलंकेविरुद्ध ३१ ऑगस्ट रोजी कँडी येथील पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. यानंतर, बांगलादेशचा गद्दाफी स्टेडियमवर ३ सप्टेंबर रोजी त्यांच्या अंतिम गट टप्प्यातील सामना अफगाणिस्तानशी होईल. बांगलादेशचा संघ २७ ऑगस्टला ढाका येथून श्रीलंकेला रवाना होणार आहे. दुखापतग्रस्त इबादत हुसेनच्या जागी नुकताच संघात समाविष्ट केलेला युवा वेगवान गोलंदाज तनझिम हसन शाकिब हा देखील संघासोबत प्रवास करणार नाही. त्याचे तिकीट अद्याप निश्चित झालेले नसल्यामुळे तो नंतर यजमान देशात जाईल. बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या (बीसीबी) क्रिकेट सुकाणू समितीचे अध्यक्ष जलाल युनूस यांनी रविवारी २७ ऑगस्ट रोजी लिटनच्या अनुपलब्धतेची पुष्टी केली. डेली स्टारने जलाल यांच्या हवाल्याने म्हटले आहे की, "लिटनचा ताप उतरला आहे. त्यांची डेंग्यू चाचणी निगेटिव्ह आली आहे. त्यामुळे तो लवकर बरा झाला, तर तो पुढील विमानाने श्रीलंकेला जाणार आहे.

# आशिया कपवर कोरोनाचं संकट?

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आशिया चषक २०२३ला फक्त एक आठवडा बाकी आहे, पण त्याआधीच मालिकेवर करोनाच संकट समोर आलं आहे. श्रीलंकेचे दोन खेळाडू कोविड पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले आहे. कोविड-१९चा कहर संपल्यानंतर क्रिकेटमधूनही सर्व प्रोटोकॉल काढून टाकण्यात आले, त्यानंतर खेळ सामान्यपणे सुरू झाले.

पण श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये होणाऱ्या या मोठ्या कार्यक्रमापूर्वीच कोविडचा धोका समोर आला आहे. श्रीलंकेचे पत्रकार दानुष्का अरविंदा यांनी दिलेल्या वृत्तानुसार, सलामीवीर अविष्का फर्नांडिस आणि संघाचा यष्टिरक्षक फलंदाज कुसल परेरा कोविड पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले आहे. आशिया कप २०२३ सुरू होण्यापूर्वी दोन्ही खेळाडूंची कोविड चाचणी करण्यात आली होती. त्यातून हे स्पष्ट दिसून आले की खेळाडूंना करोनाची लागण झाली आहे. श्रीलंकेच्या संघातील खेळाडूंना करोनाची लागण होण्याची ही पहिलीच वेळ नाही.

फर्नांडो आणि परेरा यांना आधीही करोनाची लागण झाली होती. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये श्रीलंका आणि झिम्बाब्वेच्या वन डे मालिकेपूर्वी फर्नांडिस यांची करोना चाचणी करण्यात आली होती, ज्यामध्ये कोविड-१९ लसीचा बूस्टर डोस दिल्यानंतरही त्याला संसर्ग झाल्याचे आढळून आले होते.